**राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**परिचलन पध्दतीने मान्यतेसाठी बाब**

**विषय :-** **महाराष्ट्र राज्य व मध्यप्रदेश राज्य यांचे मध्ये झालेल्या परस्पर वाहतूक करारांतर्गत समाविष्ट असलेल्या गोंदीया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गासाठी स्थायी टप्पा वाहतूक परवान्यांचे वितरण करणेबाबत**

महाराष्ट्र राज्य व मध्यप्रदेश राज्य तसेच महाराष्ट्र राज्य व छत्तीसगड राज्य यांचे मध्ये झालेल्या परस्पर वाहतूक करारांतर्गत समाविष्ट असलेल्या आंतरराज्यीय मार्गांवर स्थायी टप्पा वाहतूक करण्यासाठी राज्य परिवहन प्राधिकरणाने माहे ऑक्टोबर २०११ मध्ये ठराव क्र. २५/२०११ अन्वये परिचलन पध्दतीने मंजूरी दिली. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना प्रथम प्राधान्याने २११ मार्गासाठी दिनांक ०४.०१.२०१२ रोजी इरादापत्र देऊन दिनांक ०१.०२.२०१२ ते ३१.०१.२०१७ या कालावधीसाठी एकूण २११ स्थायी परवाने मंजूर केले. सदर इरादापत्राच्या परिच्छेद क्रमांक ६ च्या अटीनुसार परवाना जारी केल्यापासून १२० दिवसाच्या आत प्रत्यक्ष प्रवासी वाहतुक सुरु करणे बंधनकारक करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास जारी करण्यात आलेल्या २११ परवान्यांस एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही त्यापैकी १३८ परवान्यांवरील मार्गावर महामंडळांकडून प्रवासी वाहतुक सुरु करण्यात आली नव्हती. सदर मार्गावर वाहतुक सुरु का करण्यात आली नाही याचा खुलासा व पुरावाही महामंडळाकडून सादर करण्यात आला नाही. त्यामुळे राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या ठराव क्र.९/८९ अन्वये प्रदत्त अधिकारांतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास उपरोक्त मार्गास जारी केलेले परवाने दिनांक ०१.०६.२०१३ पासून या कार्यालयाने दिनांक ३१.०५.२०१३ रोजीच्या आदेशान्वये रद्द केले.

सदर रद्द केलेल्या परवान्यांमध्ये गोंदिया ते लांजी (ए-१२६) या मार्गावर १० फेऱ्यांसाठी परवाना क्र. १२१२, १२१३, १२१४, १२१५/एसटीए/स्टेज/२०१२ असे एकूण ४ परवाने होते.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९.०४.२०१३ च्या बैठकिमध्ये ठराव क्र. १३/२०१३ अन्वये आंतरराज्यीय मार्गांवर परवाने वाटपासाठी धोरण निश्चित करुन नव्याने जाहिरात देऊन खाजगी वाहतूकदारांकडून अर्ज मागविण्याचा निर्णय घेतला. त्याअनुषंगाने आंतराज्यीय मार्गावर उपलब्ध परवाने वाटपासाठी दिनांक १९.०६.२०१३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीमध्ये गोंदिया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गावर १० फेऱ्यांसाठी ४ परवाने उपलब्ध होते. जाहिरातीत नमूद केलेल्या विहित कालावधीत एकही अर्ज प्राप्त झाला नाही.

तद्नंतर सदर मार्गावर खाजगी वाहतुकदारांकडून दिनांक ०२.०९.२०१३ ते दिनांक २४.१०.२०१३ या कालावधीत उपलब्ध फेऱ्यांसाठी १० अर्ज प्राप्त झाले. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या ठराव क्र. १३/२०१३ नुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार खाजगी वाहतुकदार श्री. मनजीतसिंग गुलाटी परवाना मिळण्यास पात्र ठरले.

या कार्यालयाच्या दिनांक ३१.०५.२०१३ चे आदेशान्वये रद्द करण्यात आलेले परवाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी परिवहन आयुक्त कार्यालयात दिनांक २३.०६.२०१४ रोजी जमा केले व त्याच दिवशी गोंदिया ते लांजी (ए-१२६) या मार्गासाठी नवीन परवाने मिळण्यासाठी विनंती केली.

गोंदिया ते लांजी (ए-१२६) या मार्गासाठी खाजगी वाहतुकदार श्री. मनजीतसिंग गुलाटी परवाना मिळण्यास पात्र होते. तथापी, राज्य परिवहन प्राधिकरणाच्या ठराव क्र. २५/२०११ मधील (ध) नुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना सर्वोच्च प्राधान्य देऊन पुन:श्च गोंदिया ते लांजी (ए-१२६) आंतरराज्यीय मार्गासाठी दि. ०५.०१.२०१५ ते ०४.०१.२०२० या कालावधीसाठी १० फेऱ्यांसाठी ४ परवाने (परवाना क्र. १५४९, १५५०, १५५१, १५५२/एसटीए/स्टेज/२०१५ ) जारी करण्यात आले.

गोंदिया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गावर प्रवासी वाहतुक सुरु न केल्याने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना दिनांक १२.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले. सदर परवाने प्रतिस्वाक्षरी करण्याकरीता राज्य परिवहन प्राधिकरण, ग्वालियर, मध्य प्रदेश यांच्याकडे प्रयत्न सुरु असल्याबाबत तसेच सदर परवान्यावर अद्यापपावेतो वाहतुक सुरु केली नसल्याबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी दिनांक २१.०७.२०१६ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविले.



Scanned with CamScanner

गोंदिया ते लांजी (ए-१२६) या मार्गावरील परवान्यांचे प्रतिस्वाक्षरीचे आवश्यक दस्तऐवज सादर न केल्याने उक्त प्रतिस्वाक्षरीचे प्रकरण राज्य परिवहन प्राधिकरण, ग्वालियर, मध्यप्रदेश यांनी दप्तरी दाखल केले असल्याचे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन निगम, भंडारा यांना राज्य परिवहन प्राधिकरण, ग्वालियर, मध्यप्रदेश यांनी दिनांक ३०.११.२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे.

दरम्यान, गोंदिया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गासाठी परवाने मिळण्यासाठी अर्जदार श्री. मनजीतसिंग गुलाटी यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका क्रमांक १५६६/२०१६ दाखल केली. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी दिनांक १९.१२.२०१६ रोजी आदेश पारीत केले की, अर्जदाराच्या अर्जावर तीन महिन्याच्या आत निर्णय घेण्यात यावा. सदर आदेशाची प्रत या कार्यालयास दिनांक ३१.१२.२०१६ रोजी कोर्टाच्या अधिकृत संकेत स्थळावरुन प्राप्त झाली. व सरकारी वकिल, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचेकडून दिनांक १७.०१.२०१७ रोजी प्राप्त झाली.

त्याअनुषंगाने सदर निर्णयाची प्रत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या निदर्शनास आणून राज्य परिवहन प्राधिकरण, ग्वालियर, मध्यप्रदेश यांच्याकडून उपरोक्त मार्गावरील परवाने प्रतिस्वाक्षरी करुन घ्यावे व तसे या कार्यालयास त्वरीत कळविण्यात यावे अन्यथा सदर परवाने इतर अर्जदारांना देण्याबाबतचा निर्णय घ्यावा लागेल याची नोंद घ्यावी असे त्यांना दिनांक १७.०१.२०१७ चे पत्रान्वये कळविण्यात आले. परंतु त्यांच्याकडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही.

सदर मार्गासाठी परवाने मिळण्यासाठी सदर अर्जदार श्री. मनजीतसिंग गुलाटी यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे दुसरी रिट याचिका क्रमांक २९१७/२०१६ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी दिनांक ०४.०१.२०१७ रोजी आदेश जारी केले की, सदर मार्गासाठी नवीन जाहिरात देऊन आदेशाच्या दिनांकापासून ४ आठवडयात निर्णय घेण्यात यावा. सदर आदेशाची प्रत श्री. मनजितसिंग गुलाटी यांचेकडून त्यांच्या दिनांक २५.०१.२०१७ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झाली. तसेच, सरकारी वकिल नागपूर यांचेकडून या कार्यालयास दिनांक २७.०१.२०१७ रोजी प्राप्त झाली.

याअगोदर सदर मार्गासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना दि. ०१.०२.२०१२ ते ३१.०१.२०१७ या कालावधीकरीता १० फेऱ्यांसाठी ४ परवाने जारी केले होते. त्यावेळेला सदर मार्गासाठी प्रवासी वाहतुक सुरु न केल्यामुळे या कार्यालयाने दिनांक ३१.०५.२०१३ रोजी सदर परवाने रद्द केले होते. आतादेखील तशीच पुनरावृत्ती होत असल्याने सदर मार्गावरील आपणास जारी केलेले परवाने रद्द का करु नये? याबाबतचा खुलासा सदर पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापसून १० दिवसाच्या आत सादर करावा अन्यथा याबाबत आपले काहीही म्हणणे नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल असे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना दिनांक २५.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. तथापी, अद्याप त्यांच्याकडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही. यावरुन उपरोक्त परवाने रद्द करण्याविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना काही म्हणणे सादर करावयाचे नाही असे स्पष्ट होते.

परस्पर वाहतुक कराराचा उद्देश असा आहे की, आंतरराज्यीय मार्गांवर नागरिकांना परिवहन सेवा उपलब्ध व्हावी. राज्य मार्ग परिवहन महामंडळाने उपरोक्त मार्गावर परवाने प्राप्त करुन वाहतूक सुरु न केल्याने नागरिकांना वाहतूक सेवा उपलब्ध होत नाही व शासनाला प्रवासी करापोटी महसूलास ही मुकावे लागत आहे. त्याचबरोबर अन्य वाहतूकदारांना देखील व्यवसायाची संधी उपलब्ध होत नाही. यासर्व बाबी विचारात घेऊन तसेच रिट याचिका क्र. १५६६/२०१६ व २९१७/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या ठराव क्र.९/८९ अन्वये प्रदत्त अधिकाराअंतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास गोंदिया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गासाठी जारी करण्यात आलेले १० फेऱ्यांसाठीचे ४ परवाने (परवाना क्र. १५४९, १५५०, १५५१, १५५२/एसटीए/स्टेज/२०१५ ) दिनांक १०.०२.२०१७ पासून या कार्यालयाने दिनांक १०.०२.२०१७ चे पत्रान्वये रद्द केले आहेत.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या अधिनियम ८० च्या तरतुदींचा विचार करुन आंतरराज्यीय मार्गांवर रिक्त फेऱ्यांसाठी परवाने वाटपासाठी जाहीराती संदर्भात राज्य परिवहन प्राधिकरणाने त्यांचा ठराव क्रमांक २५/२०११ मध्ये नमुद जाहीरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्याची अट रद्द करण्याची बाब राज्य परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक ३१.०५.२०१६ रोजीच्या २५७ व्या बैठकित विचारार्थ सादर करण्यात आली होती. सदर बैठकित प्राधिकरणाने



Scanned with CamScanner

ठराव क्र. ०६/२०१६ अन्वये महाराष्ट्र मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र छत्तीसगढ राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत आंतरराज्यीय मार्गांवर टप्पा परवाने मंजूर करणेबाबत जाहिरात देऊन अर्ज मागविण्याबाबतची अट कायम ठेवण्याचा निर्णय घेतला.

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी गोंदिया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गावर उपलब्ध झालेल्या परवाने वाटपासाठी जाहिरात देऊन सदर परवान्यांचे वाटप करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर

**ठराव**

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी गोंदिया ते लांजी (ए-१२६) या आंतरराज्यीय मार्गावर उपलब्ध झालेल्या परवाने वाटपासाठी सोबत जोडल्याप्रमाणे जाहिरात देऊन राज्य परिवहन प्राधिकरणाच्या ठराव क्र.२५/२०११ नुसार विहित करण्यात आलेले निकष व ठराव क्र.१३/२०१३ मध्ये निश्चित करण्यात आलेली उत्पन्नाची अट पूर्ण करणाऱ्या अर्जदारास प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वाने परिवहन आयुक्त स्तरावर परवाने जारी करण्यात यावेत.

यापूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास दोन वेळा परवाने जारी करुनही त्यांचेकडून सदर मार्गावर वाहतुक सुरु न करण्याच्या कारणामुळे परवाने रद्द करण्यात आले आहेत. आता नव्याने जाहिरात दिल्यानंतर सदरहू परवाने मिळणेकरिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर राज्य परिवहन प्राधिकरणाच्या ठराव क्र.२५/२०११ नुसार विहित करण्यात आलेले निकष व ठराव क्र. १३/२०१३ मध्ये निश्चित करण्यात आलेली उत्पन्नाची अट पूर्ण करणाऱ्या अर्जदारास प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वाने परवाने जारी करण्यात यावेत. तथापी, संबंधीत वाहतुकदारास परवाना जारी दिनांकापासून प्रत्यक्ष प्रवासी वाहतुक १२० दिवसांत सुरु करणे बंधनकारक करण्यात येत आहे. सदर कालावधीत वाहतूक सुरु करण्यात आली नाही तर जारी करण्यात आलेला परवाना रद्द करुन उपरोक्त ठरावातील निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रतिक्षा यादीतील वाहतूकदारांस परवाने जारी करण्यात यावेत. सदर अट महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून अर्ज प्राप्त झाल्यास त्यांनादेखील लागू राहील.

**(ठराव क्रमांक ०१/२०१७)**

स.बा.सहस्त्रबुध्दे
**स.बा.सहस्त्रबुध्दे**
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**सभासदांची मान्यता**

स.बा.सहस्त्रबुध्दे (अपर परि. आयुक्त)

**डॉ. प्रविण गेडाम, भा.प्र.से**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा,**
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
(on election duty)

**श्री. आर.के.पद्मनाभन भा.पो.से.**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर पोलीस महासंचालक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

17/2/17
**श्री. मनोज सौनिक**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

D:\STA\Agenda by Circulations/Inter State/3

Scanned with CamScanner